सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक १७/०२/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आसेकें-१०२२/सेतु/प्र.क्र.११/मातं दि.१४फेब्रुवारी २०२५

**विषय :-** राज्यातील जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयातील सेतू केंद्राच्या निविदा प्रक्रियेबाबत (सुधारित मार्गदर्शक सूचना)

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आसेके-१०२२/सेतू/प्र.क्र.११/मातं, दि.१४फेब्रुवारी २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०२१४१६३९४४५००७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकेनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था/प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.


Scanned with CamScanner

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रांच्या निविदा प्रक्रियेबाबत (सुधारित मार्गदर्शक सूचना)

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- आसेकें-१०२२/सेतू/प्र.क्र.११/मातं,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई, ४०००३२
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०२५.

**संदर्भ** :- सा.प्र.वि.(मातं), शासन निर्णय क्र. आसेकें-१०२२/सेतू/प्र.क्र.११/मावतं, दि. १९/०७/२०२४.

**प्रस्तावना** :-

सामान्य जनतेला विविध शासकीय सेवा मिळविण्यासाठी लागणारा श्रम, वित्त व वेळ यांचा अपव्यय टाळून त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विहित मुदतीत विविध विभागांच्या सुविधा सेतू केंद्रांच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा व तालुका ठिकाणी सेतू सुविधा केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे संस्थांची निवड करुन संस्थामार्फत सेतूचे कामकाज चालविण्यात आले. तदनंतर, जिल्हा व तालुका स्तरावरील सेतू केंद्रे (जिल्हा सेतू समिती सोबत कंत्राट अस्तित्वात असल्यास) " आपले सरकार सेवा केंद्रे" म्हणून अधिसूचित करण्यात आली आहेत.

तथापि, सेतू सुविधा केंद्रांवर नेमलेल्या एजन्सीची मुदत संपल्यामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी उपरोक्त संदर्भाधीन दि.१९/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रे सुरु करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, नागरिकांना सुलभरित्या आपले सरकार सेवा केंद्र/सेतू केंद्रांच्या सेवा उपलब्ध होण्याकरिता कंत्राटदार/सेवा पुरवठादार कंपनीमध्ये स्पर्धात्मकता निर्माण होण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. :-

**शासन शुध्दीपत्रक** :-

राज्यातील जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रांच्या निविदा प्रक्रियेबाबत निर्गमित संदर्भाधीन दि.१९/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अनु.क्र.०३ व ०६ मध्ये सुधारणा करण्यात येत असून, त्याऐवजी अनु.क्र.०३ व ०६ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा. :-

**अनु.क्र.०३ :-** "जिल्हा सेतू समितीने सेतू केंद्रे खाजगी कंत्राटदारांना कंत्राटी पद्धतीवर देण्यासाठी पारदर्शकपणे निविदा प्रक्रिया राबवावी. ही निविदा प्रक्रिया राबवितांना शासनाने दिलेल्या वेगवेगळ्या सुचनांप्रमाणे निविदा प्रकिया पार पाडावी. निविदेच्या अटी व शर्ती जिल्हाधिकारी यांनी ठरवाव्यात व त्यात शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांचा अंतर्भाव करावा. यशस्वी निविदा धारकासोबत करार करण्यात यावा. सदर करार जिल्हा सेतू समिती व कंत्राटदार यांचेमध्ये करण्यात यावा. सुरुवातीची मुदत तीन वर्ष असावी. कराराची मुदत संपल्यानंतर नव्याने निविदा राबविण्याची प्रक्रिया करण्यात यावी. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे नविन निविदा प्रक्रिया राबवणे शक्य न झाल्यास सदर करारास प्रत्येक वेळेस एक वर्ष याप्रमाणे कमाल दोन वेळा मुदतवाढ देता येईल. त्यानंतर मात्र नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. मुदतवाढीची बाब निविदेत स्पष्टपणे नमूद करावी. "

**अनु.क्र.०६ :-** "जिल्ह्यामधील सर्व सेतू केंद्रे एका कंत्राटदारास किंवा अनेक कंत्राटदारांना विभागून द्यावे याबाबतचा निर्णय स्थानिक वस्तुस्थितीचा विचार करुन संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी घ्यावा. तथापि, एकाच कंत्राटदारास राज्यातील ०४ पेक्षा अधिक जिल्ह्यामधील आपले सरकार सेवा केंद्र/सेतू केंद्राचे कंत्राट मिळणार नाही, याची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी खात्री करावी. तसेच, यासंदर्भात कंत्राटदारांकडून निविदा सादर करताना हमीपत्र घेण्यात यावे."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा सांकेतांक २०२५०२१४१६३९४४५००७ असा आहे. हे शासन शुद्धीपत्रक डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by BHARATI DINESH DHURI
Date: 2025.02.14 16:40:38 +05'30'

**(भारती दि. धुरी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय
८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,

९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१०) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१२) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५) सर्व पोलीस आयुक्त,
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२२) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी.
२३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२५) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६) निवडनस्ती/मातं.